# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक १२ जुलै, २०१८ / आषाढ २१, १९४० ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**<br>**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) पर्यावरण मंत्री**<br>**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर येथील विभागीय क्रीडा संकुलातील जलतरण तलावाचे काम पूर्ण करणेबाबत

**(१) * १२४४७५ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात जलतरण तलावाचे काम अपूर्ण असल्याने जलतरणपटूंना बंगलोर येथे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जलतरण तलाव व डायव्हिंग तलावाचे ५०% काम पूर्ण झालेले असल्याने उर्वरित तलावाचे काम सुरु करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत वास्तुविशारद यांना प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित केले असून त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक सहाकार्याने अंतिम आराखडा तयार करुन समितीच्या मान्यतेनंतर काम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जलतरण तलावाचे काम पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, सदर जलतरण तलाव अपूर्ण असल्याने जलतरणपटूंना बंगलोर येथे जावे लागते हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रस्ताव शासनास सादर केलेला नाही.

(४) विभागीय क्रीडा संकुलातील जलतरण व डायव्हिंग तलावाचा सुधारीत आराखडा व त्यानुसार कामकाज करण्यासाठी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत केलेली होती. सदर तज्ञ समितीने आपला अहवाल क्रीडा संकुल समितीच्या दिनांक ०२.०१.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत सादर केला होता. सदर अहवालावर संकुल समिती सदस्यांमध्ये सखोल चर्चा होऊन अहवाल फेटाळण्यात आला व विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष यांनी याबाबतचा सुधारीत आराखडा नव्याने सादर करण्याचे निर्देश दिले. सदरचा सुधारीत आराखडा प्राप्त झालेला आहे. सुधारीत आराखडा अंतिम करण्यात येवून त्यानुसार जलतरण व डायव्हिंग तलावाचे कामकाज सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यात अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२) * १२३९८० श्री.राहूल कुल (दौंड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यातील पिण्याचे पाणी दुषित असल्याचे राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेच्या तपासणीत माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येकाला शुध्द पाणीपुरवठा करण्याची स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी असूनही महापालिका, नगरपरिषदा व ग्रामपंचायत नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा करण्यास असमर्थ ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दूषित पाण्यामुळे पटकी, कावीळ, विषमज्वर, अतिसार अशा जलजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमध्ये एप्रिल २०१८ मध्ये एकूण ५३५१२ पाणी नमुने जैविक तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ४६०६ पिण्यास अयोग्य आढळले असून दूषित पाण्याचे प्रमाण ९% आहे.

अशावेळी दूषित पाणी असणारे स्रोत बंद ठेवून त्याऐवजी पर्यायी स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असतो.

(३) व (४) हे खरे नाही.

दूषित पाण्यामुळे पटकी, कावीळ, विषमज्वर, अतिसार असे जलजन्य आजार पसरल्यास या जलजन्य आजारावर प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१. जलजन्य आजाराचे नियमित सर्वेक्षण, २. जलजन्य आजारासाठी आरोग्य संस्थाना आवश्यक औषध पुरवठा, ३.पाणी शुध्दीकरणासाठी जलसुरक्षकांचे नियमित प्रशिक्षण, ४. ग्रामविकास व पाणी पुरवठा विभागाच्या समन्वयाने नियमित स्वच्छता सर्वेक्षण, ५. जलजन्य आजार प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण, ६. जलशुध्दीकरण यंत्रणा, RO, DFU इ. बसवून शुध्द पाणी पुरवठा करण्यात येतो, ७. राज्यात पाणी नमुने तपासण्याकरिता प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात येत आहे, ८. जलसुरक्षकांना उद्दिष्टानुसार पाणी नमुने गोळा करण्याचे काम यशस्वी करण्यास प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो, ९. नळपाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत राज्यस्तरावरुन विशेष पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा व माढा (जि.सोलापूर) तालुक्यात जलशुध्दीकरण यंत्रणा बसविणे तसेच उजणी (जि.पुणे) जलाशयातील प्रदुषणाबाबत

**(३) * १२२७३७ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा व माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कांही गावांमधील भूगर्भातील पाणी क्षारयुक्त असणे तसेच पुणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमधील इतर कारखाने व साखर कारखान्यातील दुषित तसेच घातक रसायनयुक्त पाणी भिमा नदीव्दारे उजनी जलाशयात जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील ग्रामस्थांना दुषित पाणी प्यावे लागून आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याने पाणी शुध्दीकरण यंत्रणा बसविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर तालुक्यातील ग्रामस्थांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता जलशुध्दीकरण यंत्रणा बसविण्यासंबंधीची कार्यवाही सुरू आहे. तसेच उजनी जलाशयात होत असणा-या पाणी प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाकडे उचित कार्यवाही करण्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबाबत

**(४) * १२११०९ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नसल्याने या शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन ज्ञानार्जनाचे काम करीत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या तालुक्यातील शासकीय अनुदानापासून वंचित असलेल्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना अनुदान वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

शासन निर्णय, दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.सदर शासन निर्णयांमध्ये,सदर तालुक्यांच्या शाळांचा समावेश आहे. उच्च माध्यमिक शाळांच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४ (३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात संच मान्यतेत क्रीडा शिक्षकांची पदे रद्द करण्यात आल्याबाबत

**(५) * ११६५९७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शारिरीक शिक्षण शिक्षक हे सन २०१५-१६ व २०१६-१७ पासून संच मान्यतेत माध्यमिक मधून प्राथमिक पदवीधर मध्ये समाविष्ट करण्यात आल्याने पदवीधरांची पदावनत केलेली श्रेणी त्यांना मिळणार किंवा ते अतिरिक्त ठरणार असून शारिरीक शिक्षण शिक्षक म्हणून न राहता प्राथमिक पदवीधर झाल्याने खेळ सोडून इतर विषय शिकवावे लागणार असल्याने तांत्रिकदृष्ट्या ते अतिरिक्त ठरत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्तर रचनेप्रमाणे प्राथमिकसाठी कला क्रीडा विषयाकरिता अतिथी निदेशकाची नेमणूक करण्याचा शासन निर्णय असल्याने राज्यात २० ते २५ हजार अनुदानित शिक्षक तसेच १० ते १५ हजार विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत शाळेतील क्रीडा शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेतून कायमस्वरुपी व्यपगत होणार असून यापूढे शारिरीक शिक्षण शिक्षक हे पद रिक्त झाल्यास व ते भरण्यात येणार नसल्याने अहमदनगरचे राज्याध्यक्ष, राज्य क्रीडा शिक्षक महासंघ यांनी पुणे येथे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास माध्यमिक शिक्षण संचालक यांची भेट घेऊन पूर्वीप्रमाणे शारिरीक शिक्षण शिक्षक पद कायम ठेवण्यासंदर्भात चर्चा करुन निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेच्या प्रार्थनेपासून विद्यार्थ्यांना शिस्त लावणे, शाळेच्या तक्रारी सोडविणे, विद्यार्थ्यांच्या खेळाचा सराव घेणे त्यांची तयारी करणे आदि कामे क्रीडा शिक्षक करीत असल्याने महाराष्ट्र मागील अनेक वर्षापासून शालेय राष्ट्रीय स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकाचा आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदी विचारात घेता शासन निर्णय दिनांक २८.०८.२०१५ अन्वये विद्यार्थी संख्येवर पदे मंजूर करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोनापूर (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे निर्माण झालेली पाणीटंचाई

**(६) * १२३९४० श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनापूर (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे पिण्याच्या पाण्यासाठी विविध उपाययोजनांवर एक कोटीपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यात येऊनही पाणी टंचाई असल्याचे दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील पाणी टंचाईमुळे ग्रामस्थांना नदी-नाल्यांचे दूषित पाणी प्यावे लागून १४५ जणांना अतिसाराची लागण झाली असल्याने गावकऱ्यांनी ग्रामसेवकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सोनापूर, ता.चिखलदरा येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत रु.३९.५२ लक्ष एवढया खर्चाची पाणीपुरवठा योजना २०१५ साली कार्यान्वीत करण्यात आली आहे. तथापि यावर्षी उन्हाळयामध्ये उद्भवातील पाण्याची पातळी कमी झाल्याने पाणी टंचाई निर्माण झाली होती.

(२) अंशत: खरे आहे.

दि. ८ मे, २०१८ ते दि. १० मे, २०१८ या कालावधीत एकूण ३९ रुग्ण गॅस्ट्रो ने बाधित झाले होते.

पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर ग्रामसेवकावर कारवाई करण्याची मागणी प्राप्त झाली नाही.

(३) सोनापूर (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे ग्रामपंचायती मार्फत दि. १९ एप्रिल, २०१८ पासून टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु होता.

दि. ०८.०५.२०१८ पासून वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, टेंभुसोंडा, तालुका आरोग्य अधिकारी, चिखलदरा तसेच जिल्हा स्तरावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या चमूने मौजे सोनापूर येथे जाऊन साथी रोगाच्या अंतर्गत, सर्वप्रकारच्या प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत व त्यामुळे साथीची लागण आटोक्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर व रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील गावांचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा क्र.२ मध्ये समोवश करण्याबाबत

**(७) * १२४०६६ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर तालुक्यातील पुरनाड, हरताळा, नांदवेल व रावेर (जि.जळगांव) चिनावल या गावांचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा क्र.२ मध्ये समोवश करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरची गावे टप्पा क्र.२ मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) दि.६.०२.२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) राज्यातील लोकप्रतिनिधी व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत होणारी मागणी लक्षात घेऊन, मागणी तत्वावर आधारीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-२ राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. सदर कार्यक्रम मान्य झाल्यास उक्त गावाचा समावेश टप्पा-२ मध्ये करण्याबाबत विचार करण्यात येईल. किंवा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१८-१९ च्या आराखड्यात काही नवीन योजनांचा समावेश करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेरोजगार अभियंत्यांना सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत होणारी कामे कंत्राटी तत्वावर देण्याबाबत

**(८) * १२२९११ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बेरोजगार अभियंत्यांना सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत होणारी विविध कामे कंत्राटी तत्वावर देण्याबाबत करण्यात आलेल्या प्राविधानानुसार बी.एससी.जिओलॉजी तसेच एम.एससी जिओलॉजी झालेल्या बेरोजगार भूवैज्ञानिकांना भूजल सर्व्हेक्षण आणि विकास योजनेंतर्गत होणारी विविध भूजल पुनर्भरणाची कामे कंत्राटी तत्वावर देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला, त्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) राज्यातील बेरोजगार अभियंत्यांना सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत होणारी विविध कामे कंत्राटी तत्वावर देण्याबाबत करण्यात आलेल्या प्राविधानानुसार बी.एससी.जिओलॉजी तसेच एम.एससी जिओलॉजी झालेल्या बेरोजगार भूवैज्ञानिकांना भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणे अंतर्गत होणारी विविध भूजल पुनर्भरणाची कामे कंत्राटी तत्वावर देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून २० जून २०१६ रोजीचे मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांना अग्रेषित केलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) शासनास प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम व इतर संबंधित विभागाच्या धर्तीवर भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील विविध कामे बेरोजगार भूवैज्ञानिकांना कंत्राटी तत्वावर देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांची नियुक्ती टीईटीमार्फत करण्याबाबत

**(९) * ११९९४८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या शिक्षण हक्क कायदयाअंतर्गत (आरटीई) कलम २३ अन्वये १ ली ते ८ वी पर्यंतच्या खाजगी व सरकारी शाळांमधील शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असलेल्यामधुनच भरणे बंधनकारक असल्याचा शालेय शिक्षण विभागाने दिनांक ६ मे, २०१३ पासून शासन निर्णय परित केला असतानाही, त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने, दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी व 'एनसीटीई' ने दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी, महाराष्ट्रासह देशातील सर्व राज्यांना पाठविलेल्या पत्रात खाजगी व शासकीय शाळांमध्ये फक्त टीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेले शिक्षकच नेमले जावेत आणि पात्रता नसलेल्यांना तात्काळ सेवेतून काढण्यात यावे असे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आरटीई कायदयाची अंमलबजावणी करण्याकरिता ७ वर्षे विलंब लावल्याने शासनाला ७ हजाराहून अधिक अपात्र शिक्षकांच्या वेतनाकरिता आर्थिक भार पडत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) प्राथमिक शिक्षक पदाकरीता शिक्षक पात्रता परीक्षा दि. १३.०२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आलेले आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयासह रायगड जिल्हयातील विद्यार्थ्यांना अपघात विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

**(१०) * ११९२७० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बुलढाणा जिल्हयासह रायगड जिल्हयामध्ये शालेय विद्यार्थ्यांना अपघात विम्याचे कवच देण्यासाठी शासनाने १५ वर्षापूर्वी सुरु केलेली योजना असफल ठरली असून गत सात वर्षात बुलढाणा जिल्हयामध्ये २० तर रायगड जिल्हयामध्ये फक्त २९ विद्यार्थ्यांनाच अपघात विमा मिळाला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या कामातील दिरंगाईमुळे अनेक योजना पालक-विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने गरजू लाभार्थी मदतीपासून वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

सन २०१३-१४ ते सन २०१८-१९ या कालावधीमध्ये रायगड जिल्ह्यातील २७ आणि बुलढाणा जिल्ह्यातील १६१ विद्यार्थ्यांच्या पालकांना राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विद्यार्थ्यांची बोगस पटसंख्या दाखवून अनुदानात गैरव्यवहार केल्याबाबत

**(११) * १२१३७४ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विद्यार्थ्यांची बोगस पटसंख्या दाखवून तसेच शासनाची मान्यता न घेता अनधिकृतपणे शाळा सुरु करुन अनुदानात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी महसूल खात्यातील अधिकाऱ्यांच्या वतीने दिनांक ३, ४ व ५ ऑक्टोबर, २०११ रोजी वा त्यासुमारास राबविण्यात आलेल्या पटपडताळणी मोहिमे अंतर्गत २१ लाख विद्यार्थी बोगस आढळल्याने १४०४ प्राथमिक व २४१ माध्यमिक शाळा रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त पटपडताळणी गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या १४०४ शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात टाळाटाळ करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली तसेच उक्त अनधिकृतपणे चालविलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठ येथे दाखल जनहित याचिका क्र. १८/२०१२ व अवमान याचिका क्र. १८६/२०१४ मधील मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार संबंधित प्राथमिक व माध्यमिक शाळांना नोटीस दिली असून पुढील उचित कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(१२) * १२४५७० डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत राबविण्यात येणा-या ७०४ नळ पाणी पुरवठा योजनांपैकी केवळ ४८४ योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित २२० योजनांची कामे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेतील १७५ पाणी योजना निरुपयोगी असल्याचे तसेच २२० अपूर्ण नळ पाणी पुरवठा योजनेची कामे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय पाणी पुरवठा विभागाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास जिंतूर (जि.परभणी) तालुक्यामध्ये गत वर्षी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत किती ठिकाणी कामांना तांत्रिक मंजुरी मिळाली त्यापैकी किती ठिकाणी कामांना प्रत्यक्षरीत्या सुरुवात करण्यात आली आहे, ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर होण्यासाठी शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली तसेच पाणी पुरवठा योजनेचे योग्य नियोजन न करणाऱ्या व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यःस्थिती काय आहे तसेच प्रलंबित नळ पाणी पुरवठा योजना तात्काळ पूर्ण होण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

एकुण ७०४ योजनांपैकी ५०६ योजनेची कामे पूर्ण करुन ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत केलेली आहेत व उर्वरीत १९८ योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

निरुपयोगी योजना ७०४ मधील नसून जिल्हयातील सुरवातीपासून घेतलेल्या योजनामधील त्यांची संख्या १८५ आहे. जे कालबाहय उद्भव कोरडा इत्यादी कारणामुळे निरुपयोगी झाल्या आहेत. राष्ट्रीय पेयजल योजनांच्या ६५ योजनेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना अंतर्गत जिंतूर तालुक्यात ८ योजनांना तांत्रिक मंजूरी प्राप्त आहे. त्यापैकी ३ योजनेचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून त्यापैकी २ योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. ३ योजना निविदा स्तरावर असून १ योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही चालू आहे व १ योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत करण्यात येत आहे. पाणी टंचाई अंतर्गत पर्यायी उपाययोजना करण्यात आली असून पाणी पुरवठा योजनेचे योग्य नियोजन न करणाऱ्या समितीवर आर.आर.सी. कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) जिंतूर तालुक्यात आर.आर.सी. केलेल्या एकूण योजना १४ आहेत. पैकी ८ योजनेची कामे बंद असलेल्या योजनेवर आर.आर.सी. करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संकेतस्थळ हॅक झाल्याबाबत

**(१३) * ११९१७४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले विद्यापीठ (जि.पुणे) येथे घेतल्या जाणा-या सर्व शाखांच्या प्रश्नपत्रिका संकेतस्थळाच्या माध्यमातून परीक्षा केंद्राना ऑनलाइन पाठविल्या जातात तथापि या विद्यापीठाचे संकेतस्थळ हॅक करुन नाशिकमधील इंजिनिअरींगच्या दोन विद्यार्थ्यांनी बीएस्सी व्दितीय वर्षाच्या प्रश्नपत्रिका फोडल्या असल्याचे तसेच समाज माध्यमांवर प्रसारित केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नाशिक सायबर सेलकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी बीएस्सी व्दितीय वर्षाच्या परीक्षार्थींना मोठा धक्का बसून पुन्हा परिक्षेसाठी अभ्यास करावा लागणार असल्याने विद्यार्थी चिंताग्रस्त झाले असून नाशिक, नगर व पुणे या तिन्ही जिल्हयात फेरपरीक्षा घेणार की नाशिकमध्येच फेर परिक्षा घेण्यात येणार असा संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरण प्रामुख्याने नाशिक जिल्हयातील काही विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे फक्त नाशिक जिल्हयातील १८०० विद्यार्थ्यासाठी दिनांक १८ मे, २०१८ रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी शासन स्तरावरुन कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि, विद्यापीठ स्तरावर याबाबत चौकशी करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ कलम १२७ (८) व विद्यापीठ अध्यादेश क्र.१५७ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी नाशिक पोलीस आयुक्त येथील दाखल गुन्ह्यात सायबर सेलकडून तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता व लिपिक यांनी केलेला गैरव्यवहार

**(१४) * ११८४३४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) पश्चिम भागातील भेंडीपाडा येथील पाणी देयके भरणा केंद्रामध्ये श्री.अशोक नायर यांनी देयकाची थकीत रक्कम दाखवून जादा देयक पाठविल्याबद्दलची तक्रार वरिष्ठांकडे केल्यानंतर सदर प्रकरणी तपासादरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लिपिक, श्री.जे.सी.कांबळे यांनी पाणी देयकाचे वसुली पुस्तक व ग्राहकांना दिलेली पावती यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ग्राहकांना याबाबत तक्रार करायची असेल त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयात संपर्क साधावा असे जाहिर आव्हान कार्यकारी अभियंता यांनी वर्तमानपत्रातून केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, कार्यकारी अभियंता यांच्या आव्हानानुसार किती नागरिकांनी लेखी तक्रारी नोंदविल्या व त्या तक्रारींचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(४) असल्यास, यात दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पाणी बिलाचे वसूली पुस्तक व ग्राहकांना दिलेली पावती यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने, मुख्य अभियंता यांनी सदर प्रकरणी दिनांक २५.४.२०१८ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे श्री.जे.सी.कांबळे, कनिष्ठ लिपिक यांची तातडीने कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग, माणगाव येथे बदली केली आहे. तसेच सदर गैरव्यवहार प्रकरणी तपासणी चमु गठीत करुन गैरव्यवहार प्रकरणीचा अहवाल मागविला असता, तपासणी अहवालानुसार प्रथमदर्शनी रु.५,५३,४८८/- इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे. प्रस्तूत प्रकरणी सविस्तर चौकशी करुन नियमानुसार दोषी असलेल्यांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ११८५५८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील ४७ गावांसाठी सन २०१३ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना मंजूर करण्यात आल्या परंतु पाच वर्षे उलटूनही यातील बहुतांश कामे निधी अभावी प्रलंबित असून काही कागदोपत्रीच असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील १३ गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामीण विकास योजनेंतर्गत महालिंगी तलावातून पाणी पुरवठा करण्याची योजना राबवूनही सदर १३ गावांना पाणी मिळत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करुन नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

महालिंगी प्रकल्पातील पाणी संपल्याने व त्यानंतर सतत कमी पर्जन्यवृष्टीमुळे महालिंगी तलावात पाणी येऊ शकले नाही. त्यामुळे सध्या योजना बंद आहे.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशीक पाणी पुरवठा योजना १३ गावे दैठणा या व इतर दोन प्रादेशिक योजनेसाठी लिंबोटी धरण उदभव घेऊन दोन्ही योजनेतील अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रापर्यत पाईप लाईन टाकणे बाबत योजना ही २०१६-१७ च्या राष्ट्रीय कृती आराखडयामध्ये समावेश केलेला असून लवकरच योजना तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

तसेच राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गतच्या योजनांना समितीमार्फत अर्धवट स्थितीत ठेऊन अपूर्ण असलेल्या योजनांबांबत शासन निर्णय दि.९ मार्च, २०१८ नुसार जिल्हा परिषदेकडील योजना प्राधान्याने अंतिम करण्याची विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत

**(१६) * ११८७५९ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ पासून शिक्षकांची भरती बंद असल्यामुळे २४ हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक व माध्यमिक विभागात एकूण किती पदे रिक्त आहेत,

(३) तसेच, शिक्षकांच्या भरती बाबत चार वेळा पात्रता तर एक वेळा अभियोग्यता चाचणी घेण्यात आली तथापि भरतीबाबत शासनाकडून कोणतीच स्पष्टता करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, शिक्षक अभीयोग्यता चाचणीचा निकाल जाहीर झाल्याने भरती प्रक्रिया राबविण्यासाठी तयार केलेल्या प्रणालीचे काम अंतिम टप्प्यात आल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार शिक्षक भरतीबाबत कालबध्द कार्यक्रम जाहिर करुन शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही करण्यात येत असून या कार्यवाहीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती उपलब्ध होईल.

(३), (४) व (५) राज्यातील स्थानिक तसेच खाजगी शाळेतील शिक्षक भरती अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे करण्याबाबत शासन निर्णय दि. २३.०६.२०१७ रोजी पारित करण्यात आलेला असून याबाबत सदर परीक्षा माहे डिसेंबर, २०१७ मध्ये घेण्यात आलेली आहे. तसेच सदर शिक्षक भरती संदर्भात सविस्तर कार्यपध्दती दि. २०.०६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.मानोली (ता.मानवत, जि.परभणी) येथे पिण्याच्या पाण्याची नवी योजना मंजूर करणेबाबत

**(१७) * ११८६५३ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.मानोली (ता.मानवत, जि.परभणी) येथील शेतक-यांनी पिण्याच्या पाण्याची नवी योजना मंजूर करणे व ग्रामपचांयतीच्या गैरकारभाराची चौकशी करणे या मागण्यांसाठी स्थानिक ग्रामस्थांनी तहसिल कार्यालयात दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्यात येऊन विष प्राशन करुन आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अशंत: खरे आहे.

तहसिल कार्यालयासमोर विविध यंत्रणेमार्फत केलेल्या कामाची चौकशी करण्यासाठी अंदोलन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करुन आंदोलन केले होते.

(२) होय.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय अधिकारी, पाथरी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. चौकशीच्या वेळी तक्रारदार यांना, त्यांनी निवेदनात नमुद केलेल्या तक्रारीबाबत कागदपत्रे/पुरावा दाखल करण्याची मागणी केली असता त्यांनी कोणतीही कागदपत्रे चौकशी समितीस उपलब्ध करून दिलेली नाहीत. जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीच्या आधारे (केलेल्या चौकशीनुसार) पुढील माहिती नमुद करण्यात येत आहे.

(१) ग्रामस्थांनी निवेदनात नवीन योजनेची मागणी केली नाही. तथापि, गावातील पाण्याची निकड लक्षात घेता, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमातंर्गत आराखडा सन-२०१८-१९ मध्ये सदर गावांचा समावेश करण्यात आला आहे.

(२) १३ व्या वित्त आयोगाच्या सन २०१०-११ ते २०१४-१५ अखेर ग्रामपंचायत अंतर्गत विविध कामे करण्यात आलेली असून एकूण रु. १५५०७३६/-खर्च करण्यात आला आहे.

तसेच १४ व्या वित्त आयोगाचा सन २०१५-१६ च्या दोन बेसीक ग्रँटमधुन दोन कामे करण्यात आली. सन २०१६-१७ च्या आराखडयामधील कामावर ठराव व प्रशासकीय मान्यता घेऊन कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

(३) सन २०११-१२ या वर्षात एकुण ११ सिमेंट नाला कृषी विभागामार्फत बांधण्यात आले असून त्यापैकी एक वगळता सर्व कामे चांगली असल्याचे आढळून आले. एक बंधारा शेतकऱ्यांनी स्वत: फोडलेला आहे.

शिवकालीन सिमेंट नाला बंधारा एकूण ९ नमुद करण्यात आले असून एका बंधा-याचे स्थान तसेच ७ बंधा-याचे कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे आढळून आले. त्यापैकी काही बंधाऱ्याच्या कामकाजाची गुणवत्ता नियंत्रण कक्षाकडून तपासणीबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

(४) जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) पाथरी अंतर्गत २०१२-१३ ते २०१७-१८ पर्यंत एकूण ९ कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी ७ कामे पूर्ण झालेली आहे. २ कामे अपुर्ण असून ते लवकरच पुर्ण करून घेण्यात येत आहे.

(५) मौजे मानोली येथील आरोग्य इमारत पाडुन नविन इमारत बांधण्यासाठी एन.आर.एच.एम./डि.पी.सी. किंवा मानव विकास मिशन यांचेकडे निधीची मागणी करण्यात येत आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर इमारतीचे बांधकाम करण्याचे प्रयोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ येथील वालधुनी नदीत (जि.ठाणे) कारखान्यातून रासायनिक सांडपाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(१८) * १२१९२२ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील काही कारखान्यातून रासायनिक सांडपाणी वालघुनी नदीत सोडण्यात येत असल्याने नदीच्या पाण्याला येणाऱ्या उग्र दुर्गंधीमुळे नदी किनाऱ्यावरील नागरिक त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रासायनिक कारखान्यातील रंगहीन सांडपाणी तसेच शहरातील सांडपाणी नदीत सोडले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदूषण मंडळाला याबाबत पूर्ण कल्पना देऊनही कार्यवाही करीत नसल्याने आयुक्तांमार्फत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) वेळो वेळी सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये पाहणी केली जाते व स्थानिक क्षेत्रामध्ये दोषी अढळल्यास संस्थांवर कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबई, नवी मुंबई, पुणे, चंद्रपूर, नागपूर व सोलापूर शहरांतील प्रदुषणात वाढ होत असल्याबाबत

**(१९) * ११६७४७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राज पुरोहित (कुलाबा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबई, नवी मुंबई, पुणे, चंद्रपूर, नागपूर व सोलापूर या शहरांतील प्रदुषणात अधिक वाढ होणे, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायजेशन ने केलेल्या वायू प्रदूषणाच्या चाचणीत मुंबईत प्रदूषण नियंत्रण विभागाच्या दुर्लक्षामुळे दर १० लोकांपैकी ९ लोकं प्रदूषित हवेत श्वासोच्छवास करत असणे तसेच २९ टक्के औद्योगिक कंपन्यांतून धोकादायक रासायनिक वायू हवेत सोडला जात असल्याची माहिती जागतिक आरोग्य संघटनेने माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध केलेल्या २०१७-२०१८ वर्षातील तीन महिन्यांच्या आकडेवारीनुसार पुणे शहरातील कर्वे रस्ता, नळस्टॉप आणि स्वारगेट भागातील वायू प्रदूषणात वाढ झाल्याचे तसेच मागील तीन महिन्यात वातावरणात तरंगणाऱ्या धूलिकणांचे प्रमाण हे जास्तीत जास्त १८६ मायकोग्रॅम प्रतिलिटर इतके असून सल्फरडाय ऑक्साइड आणि नायट्रस ऑक्साइडच्या प्रमाणात अनुक्रमे ५४ आणि १४७ मायक्रोग्रॅम प्रतिलिटर इतकी वाढ झाल्याने येथील नागरीकांना श्वसनास त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शहरातील नागरिकांना शुध्द हवा उपलब्ध करुन देण्यासाठी मुंबईत ५० ठिकाणी व पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व चंद्रपूर या पाच महानगरपालिका क्षेत्रात प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविणे तसेच हवेतील वाढते प्रदूषण कमी करण्याबाबत स्ट्राटा इनव्हिरो कंपनीने मा.पर्यावरण मंत्री यांच्या पुढे सादरीकरण केले असुन याच्या मदतीने मुंबई व राज्यातील अन्य शहरात वाहने, इमारतींच्या बांधकामातील धूलीकण, धूर यामुळे होणारे प्रदूषण शास्त्रोक्त पध्दतीने कमी करण्यावर अधिक भर देण्याची गरज असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील उपरोक्त शहरांमधील प्रदुषणाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) हवेच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील १७ प्रदूषीत शहरांचा कृती आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्‍यापीठाच्या ग्रंथालयामधील पुस्तकांची पडताळणी करण्याबाबत

**(२०) * ११६७६६ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्‍यापीठाच्या ग्रंथालयामधील कोट्यवधी रूपयाच्या पुस्तकांची वार्षिक पडताळणी गत २४ वर्षापासून झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर विद्‍यापीठामध्ये ३ लक्ष ८५ हजार ८९० पुस्तकांचा संग्रह, १४ हजार ९७४ दुर्मिळ व मौल्यवान पुस्तके, ३६ हजार २५९ नियतकालीकांचे सीमित ग्रंथ व १४ हजार ३१२ हस्तलिखिते ही कॅम्पसमधील ग्रंथालयात ठेवण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कॅगनी दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी या सपंलेल्या वर्षाचा अहवाल सादर करतांना सन २०१२-१३ ते सन २०१६-१७ या कालावधीची तपासणी केली असता कर्मचाऱ्यांची कमतरता व पुस्तकांच्या जास्त संख्येमुळे ग्रंथालयाची स्थिती फारशी चांगली नसल्याचे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर विद्‍यापीठातील ग्रंथालयामधील पुस्तकांची वार्षिक पडताळणीची कामे एखाद्‍या स्वतंत्र अधिकाऱ्यांकडुन करण्यात आलेली आहेत काय तसेच त्याकरीता कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

सन २०१६-१७ च्या कॅगच्या अहवालामध्ये सन १९९४ पासून विद्यापीठांच्या ग्रंथालयामधील पुस्तकांची पडताळणी झाली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. तथापि, विद्यापीठाच्या परिसर ज्ञानस्त्रोत केंद्रातील ग्रंथ पडताळणी सन २००० मध्ये करण्यात आलेली आहे. तसेच यावर्षी शैक्षणिक विभागामधील १५ ग्रंथालयातील ग्रंथपडताळणीचे काम पूर्ण झालेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नागपूर विद्यापीठातील ग्रंथालयात १४९७४ दुर्मिळ व मौल्यवान पुस्तके नसून त्यांची संख्या १६९७४ असल्याचे कॅग अहवालात नमूद आहे.

(३) अंशतः खरे आहे.

कॅगच्या अहवालमध्ये विद्यापीठ ग्रंथालयाच्या स्थितीबाबत काहीही भाष्य करण्यात आलेले नाही. तथापि, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे ग्रंथालयातील पुस्तकांची भौतिक तपासणी (ग्रंथपडताळणी) करणे शक्य झाले नसल्याचे ग्रंथपालानी कॅगला देण्यात आलेल्या उत्तरात नमूद केलेले आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(२१) * ११७६२४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद परिसरातील चिखलोली धरणामधील पाणी तेथील कंपन्यांनी सोडलेल्या रासायनिक सांडपाण्यामुळे दूषित झाले असून या धरणातून शहरातील पूर्व भागातील सुमारे पन्नास टक्के

लोकवस्तीला पाणी पुरवठा करण्यात येत आहे. जावसाई ठाकूर पाड्यातील अंदाजे २१ आदिवासींना तसेच अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील इतर अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा योग्य पुरवठा होत नसल्याने तलावातील दुषित पाणी प्यायल्यामुळे पोटाचे विकार तसेच डोकेदुखीचा त्रास झाल्याने त्यांना बी.जी.छाया रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून पाण्यापासून वंचित ठेवणारे सबंधित अधिकारी व धरणामध्ये रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या कंपनी व मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. अंबरनाथ शहरातील पूर्व भागातील लोकवस्तीला, एम.आय.डी.सी. व जलसंपदा खात्याच्या अधिनस्त असलेल्या लघु पाटबंधारे विभाग, कळवा कार्यालयाच्या अखत्यारीतील चिखलोली धरणातून पाणी उपलब्ध करुन घेऊन, पाणी पुरवठा करण्यात येतो.

जावसई परिसरातील आदिवासी ठाकूरपाडा या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची वितरण व्यवस्था नाही. या परिसरातील नागरिकांकडून त्या ठिकाणी असलेल्या विंधन विहिरीतील पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याने, या क्षेत्रातील नागरिकांना पोटाचे विकार तसेच डोकेदुखीचा त्रास झाला.

(२) होय. तज्ञांकडून पाण्याचे नमुने तपासले असता, धरणातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे आढळून आल्याने दि.१९.५.१८ रोजी पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आलेला होता. तथापि, एम.आय.डी.सी.कडून तातडीने पाणी उपलब्ध करुन पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे कुत्रिम पाणी टंचाई निर्माण केली होती असे म्हणता येणार नाही.

चिखलोली धरणाच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे औद्योगिक सांडपाणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मिसळत असल्याचे आढळले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात अनधिकृतरित्या निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ तयार करण्यात येत असल्याबाबत

**(२२) * १२४३९४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ पूर्व (जि.ठाणे) येथील आनंदनगर महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ परिसरातील जीआयपी डॅम येथे पत्र्याच्या शेडमध्ये अनधिकृतरित्या निकृष्ट दर्जाचे साहित्य आणि तेल वापरुन अस्वच्छ जागेमध्ये फरसाण तयार करण्यात येत असल्याचे दिनांक २४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ शहरात अशाच प्रकारे अनेक कारखाने असून त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने याबाबत चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंबरनाथ शहरामध्ये फरसाण उत्पादकाचे ४ कारखाने असून त्या सर्व कारखान्यांनी अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अन्वये परवाना घेतला आहे.

मे. प्रकाश फरसाण, एमआयडीसी, अंबरनाथ (पुर्व) येथे विनापरवाना फरसाण उत्पादन होत असल्याने कारवाई करुन त्यांचेविरुद्ध न्यायालयामध्ये खटला दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सीबीएसईच्या दहावी व बारावीच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत

**(२३) * ११७०९४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड**

**(धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सीबीएसईच्या दहावी व बारावीच्या हिंदी आणि संस्कृत विषयांच्या प्रश्नपत्रिका फुटल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्यानंतर पेपरफुटीपासून मुक्त अशी नवीन पध्दत अमलात आणली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, एनक्रिप्टेड (सांकेतिक भाषेत) प्रश्नपत्रिका छापण्यात आल्याने छपाई यंत्रणांच्या कार्यक्षमतेनुसार काही केंद्रावर विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वेळेवर मिळाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहावीच्या सर्वच विषयाच्या प्रश्नपत्रिका फुटल्या असल्याची माहिती अंबोली, येथील पोलीस तपासात निदर्शनास आली असून, खाजगी शिकवण्या आणि शाळांच्या संगनमताने नियम डावलून अंबरनाथ व बदलापूरमधील विदयार्थ्यांना औरंगाबादमधील शाळेतून दहावीला बसवण्याचा गैरप्रकार तसेच इतरही परिक्षेसंदर्भात अनधिकृत बाबी खाजगी शिकविण्याच्या आड घडत असल्याचे निदर्शनास येत आहे हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यात खाजगी कोचिंग क्लासेसने विद्यार्थ्यांना दहावीत पास करुन देण्याचे आमिष दाखवत अवाजवी शुल्क घेऊन ६६ विद्यार्थ्यांना सहा प्रश्नप्रत्रिका पुरविल्याची माहिती एन्काउंटर स्पेशालिस्ट दया नायक आणि त्यांच्या पथकाने दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासन चौकशी केली आहे काय, व त्यानुसार वारंवार घडणा-या प्रश्नपत्रिका फुटणा-या घटना घडू नयेत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, नवी दिल्ली (सी.बी.एस.ई.) मार्फत घेण्यात येत असलेल्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षांचे नियोजन केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात येते. याबाबत केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून माहिती घेण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येत असलेल्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या सर्वच प्रश्नपत्रिका व्हॉट्सअॅपवर प्रसारित झालेल्या नसून काही विषयांच्या प्रश्नपत्रिका व्हॉटसअॅपवर प्रसारित झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. अंबरनाथ व बदलापूर येथील खाजगी क्लास चालकाने त्यांच्या विद्यार्थ्यांना औरंगाबाद येथील विद्या विकास माध्यमिक विद्यालय, सारोळा, ता.सिल्लोड या शाळेत प्रवेश मिळवून दिला होता, ही बाब खरी आहे.

(४) अंबोली पोलीस ठाणे, मुंबई यांच्या अहवालामध्ये अशी बाब नमूद नाही.

(५) प्रश्नपत्रिका व्हॉटस्अॅपवर प्रसारित होवू नयेत, यासाठी उपाययोजना करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशींनुसार मार्च, २०१८ च्या परीक्षेपासून परीक्षा पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. याशिवाय, प्रश्नपत्रिका व्हॉटस्अॅपवर प्रसारित होणे, परीक्षेत कॉपी करणे व तत्सम गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याबाबत विचारविनिमय करण्यासाठी परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सर्व घटकांची कार्यशाळा घेण्यात आली आहे. यामधील सूचना विचारात घेवून पुढील परीक्षेमध्ये गैरप्रकार होवू नयेत यासाठी आवश्यक सुधारणा करण्यात येतील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५% राखीव प्रवेश खाजगी शिक्षण संस्थांनी नाकारल्याबाबत

**(२४) * ११७२२१ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव प्रवेश देण्यात येत असताना पालिका शिक्षण विभाग आणि उपसंचालक कार्यालयाच्या अखत्यारितील ९१ शाळांमध्ये आरटीईच्या एकूण १८३२ जागा असताना ५७१ विद्यार्थीना प्रवेश देण्यात आला नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खाजगी किंवा शासकीय शाळेला पूर्व प्राथमिक प्रवेशात २५ टक्के आरक्षण वंचित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुला-मुलींसाठी ठेवणे बंधनकारक असून अर्जदार पालकांच्या घराजवळच्या शाळेला प्राधान्य देणे आणि सर्व प्रकारच्या शाळांचा विचार करणे, या मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा आदेश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेला असतानाही सदरहू आदेशाचे पालन होत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात सर्वत्र इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आरटीई च्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया केवळ ४० टक्केच झाली असल्याचे दिनांक १७ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून अनेक इंग्रजी शाळा विदयार्थ्यांना राखीव जागांवर प्रवेश नाकारीत आहेत, हे ही खरे आहे काय

(४) तसेच, उक्त २५ टक्के कोटा प्रवेश प्रक्रियेची जाहिरात होत नसल्याने या प्रवेश प्रक्रियेची माहिती सामान्य पालकांपर्यंत पोहोचत नसल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त कायद्याअंतर्गत ज्या शाळांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला नाही त्या शाळांची नांवे काय आहेत,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुला-मुलींच्या प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्याबाबत तसेच राखीव जागांवर विदयार्थ्यांना प्रवेश नाकारणा-या शाळांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश नाकारलेल्या शाळांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर शाळांना नोटीस देवून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे आदेश देण्यात येतात. त्यानंतरही प्रवेश न दिल्यास सदर शाळांवर शासन निर्णयातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते.

(३) अंशत: खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) संत रामानंद इंग्लिश मिडीयम स्कूल, प्लॉट नं.८४, जिजामाता हॉस्पिटल जवळ, जयहिंद हायस्कूल समोर, पिंपरी, पुणे-१७ व श्री स्वामी समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, सेक्टर-२, इंद्रायणी, नगर, भोसरी, आकुर्डी, पुणे-२६
(६) उपरोक्त दोन्ही शाळांना नोटीस देण्यात आली आहे.

-----------------

## वेंगुर्ला व मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील नळ पाणीपुरवठा योजनेबाबत

**(२५) * ११६६०० श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सिंधुदुर्ग यांच्यामार्फत अंदाजे रुपये साडेतीनशे कोटी खर्च करून तिलारी नदीचे पाणी वेंगुर्ला व मालवण येथे नेण्याच्या नळ पाणीपुरवठा योजनेचे काम ३ वर्षापूर्वी सुरु केले असून सदर काम गत दीड वर्षापासून बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प हा वेंगुर्ला मालवण येथील हॉटेल, खाजगी कंपन्या, घरगुती वापर तसेच चिपी विमानतळ असे पाण्याचे विभाजन केलेल्या दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) पहिला मोठा प्रकल्प असून आतापर्यंत या प्रकल्पावर रुपये ५० कोटीपेक्षा अधिक रक्कम खर्च होऊनही बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्प बंद पडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, प्रकल्पाचे बंद पडलेले काम विनाविलंब सुरु करुन लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर नळ पाणी पुरवठा योजनेचे सहभागीदार मे.श्री.उत्तम स्टील प्रा.लि. यांनी त्यांच्या हिस्याचा निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे निधीअभावी देयक थकल्याने कंत्राटदाराने योजनेची कामे माहे मे, २०१५ ते

मे, २०१८ पर्यंत स्थगित ठेवली होती. शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यावर माहे एप्रिल, २०१८ अखेरीस कंत्राटदाराच्या थकीत देयकांची अदायगी करण्यात आल्यानंतर कंत्राटदाराकडून माहे मे, २०१८ पासून योजनेची कामे पुन्हा हाती घेण्यात आली.

(२) हे खरे नाही.

(३) योजनेचे सहभागीदार मे.श्री.उत्तम स्टील प्रा.लि. यांनी कामाच्या प्रगतीनुसार त्यांच्या हिस्याचा निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे योजना कार्यान्वित करण्यासाठी उर्वरित निधी शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ०३.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आली. सदर लेखाशीर्षांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या निधीतून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास रु.१६.०० कोटी इतका निधी दिनांक २८.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला. सदर निधी प्राप्त झाल्यावर माहे एप्रिल, २०१८च्या अखेरीस कंत्राटदाराच्या थकीत देयकांची अदायगी करण्यात आली. कंत्राटदाराकडून माहे मे, २०१८ पासून योजनेची कामे पुन्हा हाती घेण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आमगांव (जि.गोंदिया) येथील क्वालिटी पब्लिक स्कूलला नियमबाह्यरित्या प्रतिपूर्ती शुल्क अदा करण्यात आल्याबाबत

**(२६) * १२३२३५ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव (जि.गोंदिया) येथील क्वालिटी पब्लिक स्कूल या शाळेस गोंदिया जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागाची मान्यता नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळेला गोंदिया जिल्हा परिषदेद्वारे बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये २५ टक्के प्रतिपूर्ती शुल्क अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नियमबाह्य रितीने शासकीय निधीच्या गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) सन २०१५-१६ करीता २५ टक्के प्रतिपूर्तीची रक्कम सदर शाळेच्या बँक खात्यात जमा केली आहे.
(३) व (४) संबंधित शिक्षणाधिकारी यांना नोटीस दिली असून त्याबाबत खुलासा प्राप्त करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## अहमदनगर येथील धन्वंतरी मेडिकल ॲण्ड एज्युकेशनल फाऊंडेशन या संस्थेने खोटी कागदपत्रे दाखवून धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळवल्याबाबत

**(२७) * १२१४५४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धन्वंतरी मेडिकल ॲण्ड एज्युकेशनल फाऊंडेशन, दातरंगे मळा, दिल्ली गेट अहमदनगर ई ४७३ या संस्थेने दिशाभूल करणारी खोटी कागदपत्रे दाखवून धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळवल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेच्या अल्पसंख्याक दर्जाची चौकशी होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अल्पसंख्याक विकास मंत्री, मा.राज्यमंत्री अल्पसंख्याक विकास आणि सक्षम प्राधिकारी तथा सह सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग यांना लेखी निवेदन दिल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने छाननी केल्यानंतर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात येत आहेत.

(२) होय.

(३) विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुर्तिजापुर (जि.अकोला) येथील ग्राम सोनोरी जवळ रेशनचा गहू व तांदूळाची होत असलेली अवैध वाहतूक

**(२८) * १२११३७ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापुर (जि.अकोला) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वरील ग्राम सोनोरी जवळ रेशनचा गहू व तांदूळ खुल्याबाजारात विक्रीसाठी नेत असताना अकोला येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मालाची वाहतूक करणा-या वाहन चालकाकडे कोणताही शासनाचा परवाना आढळून आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) मुर्तिजापूर (जि.अकोला) जवळील ग्राम सोनोरी शेत शिवारामध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या बाजूला आढळलेला अन्नधान्य साठा रेशनिंगचा असल्याचे अद्याप निष्पन्न झालेले नाही. सदर प्रकरणाची पोलीस चौकशी सुरु आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदी प्रदुषण मुक्त करण्याबाबत

**(२९) * ११८६७८ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदीच्या परिसरातील रुई (हातकणंगले) बंधा-यालगत लक्ष्मी औद्योगिक वसाहतीमधील रसायनमिश्रित सांडपाणी, तसेच कोल्हापूर ते इचलकंरजीपर्यंत असलेल्या उद्योगांचे व शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता पंचगंगा नदीपात्रात सोडल्याने पाणी हिरव्या रंगाचे होणे, नदीपात्रात जलपर्णीची वाढ होऊन, नदीच्या मूळ प्रवाहात काही ठिकाणी बदल होणे, मासे मूत्यूमुखी पडणे, तळंदगे, हुपरी, सांगाव, रुई, चंदुर व पट्टणकोडोली परिसरातील नागरीकांना कॅन्सर व इतर आजारांची लागण होऊन शेतीही नापीक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे तसेच तळंदगे ग्रामपंचायतीने संबंधित विभाग व पोलिसांकडे चौकशी करुन संबंधित कंपनीवर कारवाई करण्याबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचगंगा नदी प्रदुषणमुक्त झाल्यास इंचलकंरजी व नदीकाठच्या इतर सर्व गावांची पाणी समस्या दूर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंचगंगा नदी प्रदुषण मुक्त करुन जिल्हयातील नागरीकांना शुध्द व नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अशंतः खरे आहे. तथापि जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर प्राथमिक आरोग्य केंद्र हुपरी व पट्टणकोंडोली यांच्या अहवालानुसार हातकणंगले तालुक्यामधील पिण्याच्या पाण्यामुळे तळंदगे, हुपरी, सागाव, रुई, चंदूर व पट्टणकोंडोली परिसरातील कॅन्सर व इतर आजाराची लागण झालेली नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पंचगंगा नदी प्रदूषण रोखण्याबाबत कोल्हापूर महानगरपालिका आणि इचलकंरजी नगरपालिका यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच औद्योगिक आस्थापनावर कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आग्रीपाडा येथील जमीन उर्दू भवन निर्मितीसाठी देण्याबाबत

**(३०) * १२४४१७ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आर बी चांदोरकर मार्ग, आग्रीपाडा येथील किंजल रेसिडेन्सी इमारती समोरील भूखंड (सर्वे) क्र.१९०८ क्षेत्रफळ १७०३.१९ चौ.मी.असलेली जागा यापूर्वी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोअर परेलसाठी आरक्षित असून उक्त जागा गत अनेक वर्षे विनावापर पडून असल्याने सदरहू जागेचे आरक्षण मागे घेऊन ती रीतसर उर्दू भवन बांधण्यासाठी संपादित करून ताब्यात घेण्याबाबत विभागातील लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री (नगरविकास), मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास), मा.मंत्री (नगर रचना), प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग) यांच्याकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात प्रस्तावित आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील संस्थांनी क्रीडा अनुदानात केलेला गैरव्यवहार

**(३१) * १२१५३१ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अनेक संस्थांनी व्यायामशाळा, साहित्य खरेदी, मैदान सपाटीकरण इ. योजनांतर्गत शासनाकडून क्रीडा अनुदान घेवून त्याचा अपहार केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी दोषी आढळलेल्या ११ संस्थांना व्याजासह दहा दिवसात अनुदान परत करा अन्यथा फौजदारी कारवाई करण्याचे आदेश चंद्रपूर जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर यांचेमार्फत चंद्रपूर जिल्हयातील मंजूर करण्यात आलेल्या विविध अनुदानाबाबत संबंधित संस्थांची तपासणी केली आहे. त्यानुसार ज्या ११ संस्थांनी मंजूर केलेल्या अनुदानाचा विनियोग केला नाही त्या संस्थांना दिनांक ०२.०४.२०१८ व ०५.०६.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी १४% व्याजाने अनुदान रक्कम शासनास चलनाद्वारे भरण्याकरिता कळविले आहे. तसेच सदर संस्थांना अनुदान मंजूर करताना अनियमितता केल्यामुळे व जबाबदारीने काम न केल्यामुळे तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी व क्रीडा अधिकारी यांच्यावर क्रीडा संचालनालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील सानिका केमिकलमधून झालेल्या विषारी वायु गळतीबाबत

**(३२) * ११७१८६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील सानिका केमिकल्समधून दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी रात्रीच्या सुमारास विषारी वायु गळतीमुळे एका दुचाकीस्वार तरुणाला व अन्य नागरिकांना बाधा झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेनंतर या परिसरातील नागरिकांनी कारखान्यावर निषेध मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे. तथापी सहायक पोलीस निरीक्षक महाड एमआयडीसी यांच्या दिनांक १८.०६.२०१८ च्या अहवालानुसार एकाच व्यक्तीस वायुगळतीची बाधा झाल्याचे नमूद केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २४.४.२०१८ रोजी कारखाना बंदचे आदेश बजावण्यात आले होते. तदनंतर सदर आदेशास दिनांक २.५.२०१८ रोजी तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कळमनूरी (जि.हिंगोली) सह पालघर जिल्हयातील शालेय पोषण आहारातील तांदूळाची रिकामी पोती विकून पैसे जमा करण्याबाबत दिलेले आदेश

**(३३) * ११६९०१ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कळमनूरी (जि.हिंगोली) सह पालघर जिल्हयामधील जिल्हापरिषद शाळांमध्ये ज्या पोत्यांमधून विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी तांदूळ देण्यात आला ती पोती विका आणि याचे पैसे सरकारी तिजोरीत जमा करा असा आदेश शिक्षण अधिकारी यांनी दिल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेतील दोनशे विदयार्थ्यांच्या शाळेला दोन महिन्यांना १२ ते १३ गोण्या धान्य पाठविले जात असून ते वापरुन झाल्यानंतर रिकाम्या गोण्या एकत्र करुन शिक्षकांनी त्याचा लिलाव करणे अपेक्षित असल्याने गत सहा वर्षात किती रिकाम्या गोण्या विकल्या, त्याचे किती पैसे जमा झाले याची माहिती सादर करण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले असल्याने शिक्षक संतप्त झाले असून दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास सदरहू परिपत्रक रद्द करण्याची मागणी केली असल्याचे तसेच रिकाम्या पोत्यांची विक्री करुन सदर पैसे चलनाद्वारे शासनाकडे जमा करण्याच्या विविध जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांकडून शिक्षण संस्थांना पाठविलेल्या नोटीसा मागे न घेतल्यास शैक्षणिक व्यासपीठ आंदोलन करण्याचा इशारा शैक्षणिक व्यासपीठाचे सभाध्यक्ष एस.डी.लाड यांनी दिनांक १६ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गत पाच ते सहा वर्षापासून रिकाम्या पोत्यांचा हिशोब मागितला असला तरी दरवर्षी हा हिशोब घेतला न गेल्याने सर्वच शिक्षण संस्थांनी रिकामी पोती ठेवायला नसलेली जागा तसेच गोण्यांचा दर्जा फारच निकृष्ट असल्याने त्या कोणीही विकत घ्यायला तयार नसल्याने अनेकदा त्याचा वापर पावसाळयात शाळांमध्ये पायपुसणी म्हणून केला जातो त्यामुळे गोण्यांचा लिलाव करणे शक्य होत नसल्याने तसेच त्याचा अन्य कामांकरीता केलेला वापर लक्षात घेऊन सदर रिकामी पोती विकून शासनाला रक्कम देणे शक्य नसल्याबद्दल कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून उक्त आदेशाची अंमलबजावणी नियमितपणे सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्याची रिकामी बारदाणे, तेलाचे डबे इ. साहित्य मोठया प्रमाणात शिल्लक राहत असल्याने सदर साहित्याचे निर्लेखन करुन यामधून जमा होणारा निधी शासनास जमा करण्याचे निर्देश माहे डिसेंबर, २०१२ मध्ये देण्यात आले होते. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६ च्या अहवालामध्ये या आदेशाची अंमलबजावणी न केल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबतचा मुद्या उपस्थित केला आहे. त्यामुळे याबाबतची माहिती लोकलेखा समितीस सादर करावयाची असल्याने दि.२०/०४/२०१८ च्या पत्रान्वये माहिती सादर करण्याचे निर्देश सर्व जिल्हयांना दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयामध्ये सौर उर्जेवर आधारित बंद असलेले दुहेरी पंप कार्यान्वित करण्याबाबत

**(३४) * १२०२८९ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ग्रामीण भागातील नागरिकांना अल्प खर्चात पाणीपुरवठा करण्यासाठी सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येऊन सदर योजनेतंर्गत सन २०१५ पर्यन्त ३४२ ठिकाणी पंप बसविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंपांच्या देखभाल दुरूस्तीकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याने सदर योजना बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत स्तरावरून या योजनेची माहिती जिल्हा परिषदेला पुरविण्यात येत नसल्याने नेमक्या किती गावातील पम्प बंद आहेत याविषयीची माहिती जिल्हा परिषदेकडे उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय

(२) अंशत: खरे आहे.

एकूण ६६ योजना तांत्रिक कारणास्तव बंद पडलेल्या होत्या. त्यापैकी ५३ योजना ग्रामपंचायत स्तरावर दुरुस्ती करुन कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित १३ योजनांची देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायतीने कार्यान्वित करण्यासाठी पंचायत समिती स्तरावरुन मासिक सभेत आढावा घेऊन निर्देश देण्यात आले आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षण हक्क कायदा लागू होवूनही ४ लाख मुले शाळाबाहय असल्याबाबत

**(३५) * ११८२५५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत सात वर्षे शिक्षण हक्क कायदा लागू होवूनही ४ लाख मुले शाळाबाह्य असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षाच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत ४८ हजार ३७९ मुले शाळाबाह्य होती त्यातील १५ हजार ५२९ मुलांना शिक्षणाची संधी मिळाली असून अद्यापही ३२ हजार ८५० मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे तसेच ऊसतोड कामगार व खाणीवर काम करणाऱ्या मजूरांची मुले, स्थलांतरीत मुले, परप्रंतातून पळून आलेली मुले यांचा शोध घेण्यासाठी शिक्षण विभागाकडे यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले असल्याने शिक्षक हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार मिळूवन देण्यात शासन अपयशी ठरल्याचे गत चार वर्षातील आकडेवारीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्राथमिक व उच्च प्राथमिक १ लाख ६ हजार ५२६ शाळांमधून १ कोटी ५९ लाख १ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून गतवर्षी या शाळांमधील ७७ हजार विद्यार्थ्यांची गळती झाल्याचे तर ३ हजार ७९६ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकवायला केवळ एकच शिक्षक उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची शोध मोहीम व पट नोंदणी पंधरवडा दरवर्षी शैक्षणिक सत्राच्या सुरवातीला आयोजित केला जातो मात्र मध्येच शाळा सोडलेल्या, गळती झालेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांना वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करून विशेष प्रशिक्षणाची व्यवस्था शासनाकडून करण्यात येऊन प्रत्येक विद्यार्थांवर ३००० रुपये खर्च केला जात असून उल्हासनगर येथे या योजनेखाली माहे मार्च, २०१८ पर्यंत ६०७ शाळाबाह्य विद्यार्थ्यांवर १८.२१ लाख इतका खर्च केलेला असूनही मुले शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, राज्यातील ५६९३६ मुली शाळाबाह्य असल्याचा अहवाल केंद्राच्या महिला व बाल कल्याण विभागाने माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिद्ध केला आहे, हे ही, खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांला शिक्षण देण्याबाबत तसेच शाळाबाहय विदयार्थ्यांची वाढती संख्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ६०७ शाळाबाह्य विद्यार्थ्यांपैकी सर्वेक्षणाअंती १६९ विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल केले आहे. उर्वरीत बालके या महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आढळून आले नाहीत. विशेष प्रशिक्षणांतर्गत पूरक वाचनाची पुस्तके महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परीषद,मुंबई यांच्यामार्फत पुरविण्यात आली असून सदरील रक्कम रूपये १८.२१ लाख राज्य स्तरावरून खर्च करण्यात आलेली आहे.

(५) राज्यात सन २०१८-१९ मधील शोध मोहिमेद्वारे २३८७३ मुले व २०८२५ मुली अशी एकूण ४४६९८ विद्यार्थी शाळाबाह्य असल्याचे युडाएस डेटावरून आढळून आले आहे.

(६) शाळाबाहय विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करावे अशी मागणी सातत्याने करण्यात येत असली तरी सर्वेक्षणात सर्व विद्यार्थ्यांची (२.२६ कोटी) माहिती गोळा करणे हे जिकीरीचे व क्लिष्ट काम आहे. हे विचारात घेऊन सर्वेक्षणाऐवजी शाळाबाहय विद्यार्थी शोध (Search) मोहीम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेतला जातो. यासंदर्भात विद्या प्राधिकरणाच्या समता कक्षामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पंढरपुर व मंगळवेढ़ा (जि.सोलापुर) तालुक्यातील ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजना निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३६) * १२२६५५ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर व मंगळवेढ़ा (जि.सोलापुर) तालुक्यातील अनेक गावांतील विविध ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजना निधी अभावी प्रलंबित असून शासनाकडे अद्याप अंदाजे रुपये ११ कोटी निधी प्रलंबित असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपुर व मंगळवेढ़ा तालुक्यातील ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होत असून निधी अभावी विविध पाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रलंबित असलेल्या पाणी पुरवठा योजना तातडीने कार्यान्वित होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. पंढरपुर व मंगळवेढा तालुक्यात केवळ भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम चालू आहे. सदर योजनेच्या अमंलबजावणीकरिता रु. ११६.५२ लाख निधीची मागणी प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील प्रगतीपथावरील योजनांच्या अंमलबजावणीकरिता निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) वसाहतीमधील खाडीत रसायन मिश्रीत पाणी सोडल्याने पसरलेली दुर्गंधी

**(३७) * १२१०३३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) वसाहतीमधील खाडीत टँकर चालक रात्रीच्या सुमारास रासायनिक मिश्रीत पाणी सोडत असल्याने पाण्याच्या परसलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कंपन्यांकडून टँकर मालकांना पैसे देवून रासायनिक कारखान्यांमधील रसायनमिश्रित पाणी नदी/नाल्यात सोडणाऱ्यांवर पर्यावरण विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणा-या तसेच नद्या प्रदुषित करणा-या कारखानदार, टँकर मालक व याकडे दुर्लक्ष करणारे संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील अनेक शाळांना इमारती नसल्याबाबत

**(३८) * १२४०८७ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील अनेक शाळांना इमारती नसल्याने या शाळा सद्य:स्थितीत झाडाखाली भरविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, सदर पहाणीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू ठिकाणी शाळांसाठी नवीन इमारती बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे मुद्रीत केलेल्या इयत्ता दहावीच्या पुस्तकात असलेल्या अनेक चुकांबाबत

**(३९) * ११६५९८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन**

**सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाने इयत्ता दहावी साठी भूगोलाचे नवीन पाठ्यपुस्तक प्रकाशित केले असून या पाठ्यपुस्तकातील प्रकरण ३ पान क्र.२४ वर दाखविण्यात आलेल्या भारताच्या नकाशामध्ये जम्मू व काश्मिरचा मोठा भाग भारताच्या सिमेबाहेर दाखविण्यात आला असून काश्मीर चीनला व गुजरात पाकिस्तानला जोडण्यात आल्याचे तर प्रकरण २ पान क्र.९ वर भारताच्या राष्ट्रध्वजामध्ये अशोक चक्रासाठी निळा रंग न वापरता वेगळाच रंग वापरण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बालभारतीच्या भूगोलच्या पुस्तकातील खालील चौकटीत संगणकीय आउटलाईन असलेला नकाशा हा प्रमाणबद्ध नसून त्यात मुख्यभूमी दाखवलेली नसल्याचे तर इंग्रजी माध्यमाच्या दहावीच्या पुस्तकावरील क्यूआर कोड कार्यान्वीत नसून पुस्तकात अनेक चुका असल्याचे माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अहमदनगर येथील शिक्षणतज्ञ श्री.नरेंद्र तांबोळी यांनी विज्ञान व तंत्रज्ञान भाग-२ पुस्तकातील पृष्ठ क्रमांक ७२-डोलिओलम, ॲम्फिऑक्सस या सागर निवासी प्राण्यांची प्रतिकृती, पृष्ठ क्रमांक १८ -गुणसुत्रे, पृष्ठ क्रमांक १३ मानवी श्वसनसंस्था, पृष्ठ क्रमांक ६८ आंघोळीचा स्पंज, पृष्ठ क्रमांक २३-व्दिविभाजन अशा विविध चुकांसह ४० आकृत्या चुकीच्या असल्याचे तर इंग्रजी माध्यमाच्या विज्ञानाच्या पुस्तकात शब्दांच्या (स्पेलिंग) आणि संकल्पनांच्या मांडणीत तसेच पुस्तकात प्रजनन संस्थेची माहिती देतानाही अनेक चुका झाल्या असल्याने विद्यार्थ्यांना या चुकीच्या माहितीच्या आधारेच अभ्यास करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात प्रथमच दहावीच्या अभ्यासक्रमात राज्यशास्त्र या विषयाचा समावेश करुन त्यातील एका धड्यामध्ये सत्तारुढ पक्षाच्या उदात्तीकरणाची माहिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधी तसेच मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी पत्राद्वारे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच सदर पुस्तकातील चुका दुरुस्त करुन पुस्तक पुन्हा प्रकाशित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) नाही.

(५) होय.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नळकुंड (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधलेल्या शौचालयाचे परस्पर पैसे काढणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४०) * १२३३१८ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळकुंड (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधलेल्या शौचालयाचे परस्पर पैसे काढणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी दाभा गट ग्रामपंचायतीच्या उप सरपंच श्रीमती अशिलाबाई पवार व श्री.गजानन चव्हाण यांनी पंचायत समिती गटविकास अधिकारी, मोताळा व जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समिती मोताळा मार्फत दिनांक २५/५/२०१८ रोजी चौकशी समिती स्थापन करण्यात आली. समितीने मौजे नळकुंड, ग्रामपंचायत दाभा येथे प्रत्यक्ष जाऊन मौका पाहणी करुन चौकशी केली. चौकशीत मौजे नळकुंड येथील २३ लाभार्थ्यांचे शौचालय बांधकाम पूर्ण असून लाभार्थ्यांना प्रत्येकी रु.१२०००/- इतके अनुदान धनादेशाद्वारे अदा केल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकरणी गैरव्यवहार झालेला नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या पटसंख्येत घट होत असल्याबाबत

**(४१) * ११९२५७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या १४४९ शाळांपैकी ३६७ शाळांची पटसंख्या झापाट्याने कमी होत असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये या शाळेत ५२६७० विद्यार्थी शिक्षण घेत असतांना शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता ढासळल्याने सन २०१६-१७ मध्ये सदर शाळांमधील ४२१७ विद्यार्थी इतर खाजगी शाळेमध्ये स्थालांतरीत झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळुन आले व त्यानुसार उक्त जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) बुलढाणा जिल्हया अंतर्गत शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी व शिक्षकांना येणाऱ्या समस्या निवारण्यासाठी व शैक्षणिक प्रवाहात झालेले नवीन बदल अवगत करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षणाद्वारे त्यांची कार्यक्षमता व उत्साह वृध्दींगत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक दृक-श्राव्य माध्यमातून अध्यापन करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या १०७६ शाळा लोकवर्गणीतून डिजिटल करण्यात आलेल्या आहेत. तसेच मानवविकास अंतर्गत शिक्षण विभाग माध्यमिक मार्फत एकूण २५६ जि.प. शाळामध्ये ५७३ वर्गखोल्या डिजिटल करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

बुलढाणा जिल्हा अंतर्गत जि.प. च्या शाळेमध्ये ज्ञान रचनावादानुसार वर्ग रचना व घटक संचानुसार शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यात आलेले आहेत. सदर शैक्षणिक साहित्याचा वापर करून विद्यार्थी कृतीयुक्त अध्ययन करतात. सन २०१७-१८ अखेर बुलढाणा जिल्हयात ११०४ जि.प. व न.प. शाळा प्रगत झालेल्या आहेत.

सन २०१७-१८ मध्ये २९ शाळा ह्या “आय.एस.ओ.” मानांकित आहेत.

शाळा सिध्दी अंतर्गत ६६२ शाळा “अ” श्रेणी प्राप्त आहेत.

पालक वर्गाचा व विद्यार्थ्यांचा इंग्रजी माध्यमातुन शिक्षण घेण्याचा ओढा लक्षात घेऊन ऐच्छिक स्वरूपात सन २०१७-१८ मध्ये एकुण ११५३ शाळामध्ये इ. १ ली ते ४ थी पर्यंत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत सेमी इंग्रजी वर्ग ऐच्छिक स्वरूपात सुरू केल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ व पटसंख्या टिकवुन ठेवण्यासाठी सकारात्मक परिणाम दिसून आलेला आहे.

असे विविध उपक्रम राबवून जि.प. शाळांची पटसंख्या व गुणवत्ता टिकवण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माहूर व अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील शौचालयाची कामे निकृष्ट व प्रलंबित असल्याबाबत

**(४२) * ११८५६१ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) पंचायत समितीने तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींपैकी ६१ पंचायती पाणंदमुक्त झाल्याचे घोषित केले परंतु सदर गावांमध्ये शौचालयाची कामे निकृष्ट दर्जाची असणे तसेच अपूर्णावस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील पार्डी येथे १२ हजार रुपयांच्या अनुदान तत्त्वावर ९५ टक्के शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी मार्च महिन्यांपासून पाणी टंचाई असल्याने ग्रामस्थ शौचालयाचा वापर करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तालुक्यांमध्ये पाणी टंचाई असल्याने शासनाच्या पाणंदनमुक्त गावांची योजना अयशस्वी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाणी टंचाई दूर करुन सदर गावे पाणंदन मुक्त करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) माहूर (जि.नांदेड) पंचायत समितीतील सदर गावांमध्ये शौचालयाची कामे निकृष्ट दर्जाची तसेच अपूर्णावस्थेत नाहीत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) मौजे पार्डी, ता. अर्धापूर येथे मार्च महिन्यापासून दि. २० जून, २०१८ पर्यंत पाणी टंचाई भासलेली नाही, त्यामुळे मौजे पार्डी येथे दरम्यानच्या काळात पाण्याची सोय असल्याने नागरिकांना शौचालयाचा वापर करण्यासाठी काहीही अडथळा निर्माण झालेला नाही. सदर तालुक्यातील उर्वरीत गावात पाणी टंचाई भासू नये म्हणून टंचाई अंतर्गत उपाययोजना घेऊन पाणी टंचाईवर मात केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य हागणदारीमुक्त करण्याबाबत

**(४३) * ११७३७३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील सर्व जिल्हयात मागील तीन वर्षात ६० लाख शौचालये बांधण्यात आल्याची माहिती दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी दिली असली तरी बेसलाईन सर्व्हेमध्ये समावेश नसलेल्यांसाठी अद्‌याप १ लाख १० हजार शौचालये बांधणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागामध्ये १०० टक्के शौचालये नसणे तसेच ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागामध्ये उघड्यावर शौचालयाला बसणाऱ्यांची संख्या अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे मे, २०१८ मध्ये केलेल्या बेसलाईन सर्व्हे नंतर काही कुटुंबे विभक्त झाल्याची शक्यता असल्याने अधिक शौचालये बांधण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रलंबित शौचालये बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली व सदर कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या संकेत स्थळावरून प्राप्त माहिती नुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागात सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ या तीन वर्षात खालील प्रमाणे ५०,५१,४३४ वैयक्तिक शौचालये पूर्ण झाली आहेत.

| वर्ष | पूर्ण झालेली शौचालये |
|---|---|
| २०१५-१६ | ८,८२,०५३ |
| २०१६-१७ | १९,१६,४६१ |
| २०१७-१८ | २२,५२,९२० |

सदर शौचालये सन २०१२ मध्ये करण्यात आलेल्या पायाभूत सर्वेक्षणाच्या आधारावर पूर्ण करण्यात आली आहेत. तथापि पायाभूत सर्वेक्षणात समाविष्ट नसणाऱ्या कुटुंबांची माहिती अद्ययावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील पात्र कुटुंबांना शौचालय उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

पायाभूत सर्वेक्षणात समाविष्ट नसणाऱ्या कुटुंबाना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, CSR तसेच अन्य उपलब्ध निधीतून वैयक्तिक शौचालयाची कामे पूर्ण करण्याच्या सूचना शासन स्तरावरून देण्यात आल्या आहेत.

(३) सन २०१३ नंतर काही ग्राम पंचायती नागरी भागात परावर्तीत तसेच काही कुटुंबे विभक्त झाल्याने पायाभूत सर्वेक्षणात समाविष्ट नसणाऱ्या कुटुंबांची माहिती अद्ययावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) पायाभूत सर्वेक्षणा बाहेर असणाऱ्या कुटुंबाना वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, उद्योजकांचे सामाजिक उत्तर दायित्व तसेच अन्य निधीतून लाभ मिळवण्यासाठीच्या सूचना सर्व जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी वैयक्तिक स्तरावर काही कुटुंबांनी शौचालये बांधून पूर्ण केली आहेत.

-----------------

## अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई विभागाने प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा साठा जप्त केल्याबाबत

**(४४) * १२१४६२ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई विभागाच्या अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २४ व २५ मे, २०१८ रोजी केलेल्या कारवाईत अन्न पदार्थांची विक्री आणि साठवणूक केल्याप्रकरणी मुंबईतील ८१ खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या दुकानांना कुलूपे लावून रुपये १५ लाख किंमतीचा प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा साठा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कार्यवाही केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणातील दोषी व्यक्तींना अटक केली आहे काय, त्यापैकी किती जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, प्रस्तूत प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत आयुक्त, अन्न सुरक्षा यांचेकडून कारवाई करण्यात आली असून अन्न

नमुन्यांचे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. अन्न नमुन्यांचे अहवाल प्राप्त होऊन चौकशी पुर्ण झाल्यानंतर फौजदारी खटले दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तथापि या प्रकरणातील दोषी व्यक्तींना सद्यस्थितीत अटक करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माची मान्यता तसेच राष्ट्रीय स्तरावर अल्पसंख्यांक दर्जा मिळण्याबाबत

**(४५) * ११७२७० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माची मान्यता मिळावी तसेच शासन मान्यता व राष्ट्रीय स्तरावर अल्पसंख्यांक दर्जा मिळावा या मागणीसाठी कोल्हापूरसह राज्यात ठिकठिकाणी लिंगायत समाजाच्यावतीने दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढण्यात आले तर समाजातील ३५० जाती-पोटजाती मधील बांधवानी दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास औरंगाबाद विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयावर मोर्चे काढून आपल्या मागण्यांचे निवेदन दिले असून दिनांक ३ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास सोलापूर येथे महामोर्चा काढणार असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंगायत समाजाने दिलेल्या निवेदनाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) तसेच लिंगायत समाजाच्या मागण्या प्रलंबित असल्याने उक्त समाजातील मुलामुलींची गुणवत्ता असूनही कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध होत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लिंगायत समाजाच्या मागण्या तपासून संबंधित विभागाकडे सादर करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निवेदनातील प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

(१) लिंगायत धर्माला संविधानिक मान्यता प्रदान करावी.

(२) लिंगायत धर्मीयांना राष्ट्रीय स्तरावर अल्पसंख्याक वर्गामध्ये समाविष्ट करावे.

(३) हे खरे नाही, लिंगायत समाजाच्या काही पोट जातींचा सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दिनांक ०४.०९.२०१४ च्या शासन निर्णयान्वये, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांना या सवंर्गातील जातीचे देय असलेले फायदे अनुज्ञेय आहेत.
(४) अल्पसंख्याक कार्यमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे दिनांक १३.०५.२०१४ रोजीचे अभिप्राय राज्य शासनास पाठविले आहेत व त्यामध्ये वीरशैव लिंगायत हा स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्माचा एक पंथ असल्याचे नमूद केले आहे. तसेच महारजिष्ट्रार, गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १४.११.२०१३ च्या पत्रान्वये वीरशैव/लिंगायत हा हिंदू धर्माचा पंथ असल्याने, सन २०११ च्या जनगणनेमध्ये लिंगायत समाजाची स्वतंत्र नोंद घेण्यात आलेली नाही असे नमूद केले आहे. सबब, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा व अल्पसंख्याक दर्जा देणे अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर उपनगरातील किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४६) * ११६७४२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील ४१० किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांनी केंद्र शासनाच्या औषधविक्री संदर्भातील आदेशांचे पालन न केल्याने अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास कारवाई केली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर औषध विक्रेत्यांनी दुकानात उपस्थित न राहणे ग्राहकांना औषधांच्या खरेदीनंतर बिले न देणे, विना प्रिस्क्रिप्शन औषधांची विक्री करणे इ. नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर ४१० किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांनी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्यांतर्गत नियम १९४५ मधील नियम ६५ मधील तरतुदींचे उल्लंघन केले असल्याने परवाने निलंबन/रद्द करण्याची कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुलाबा येथील ताज हॉटेलकडून एफडीएच्या नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(४७) * ११८२६१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताज समुहाच्या विविध हॉटेलपैकी मुंबईतील कुलाबा येथील पंचतारांकित हॉटेलात एफडीएने केलेल्या सर्व्हेमध्ये राज्य व केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे तसेच एफडीएचे लॉजिंग ऑफिसर श्री सुधाकर शिगवान यांच्या उपस्थितीत टाकलेल्या छाप्यात अनेक आक्षेपार्ह बाबी आढळून आल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एफडीएने केलेल्या स्टोअर हाऊसच्या तपासणीमध्ये कालबाहय ठरलेली लसून चटणीची पाकिटे, आरोग्यास हानिकारक असलेला अजिनोमोटो तसेच इतर १५ अन्नपदार्थ आढळणे, आस्थापनेमध्ये फिफा किंवा एफईओओ यंत्राचा वापर केला जात नसणे, कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र नसणे, सात रेस्टॉरंटमध्ये अन्न सुरक्षा कायदा २००६ नुसार आवश्यक असणारे व्यवस्थापन रेस्टॉरंट लायसन्स नसणे, अप्रशिक्षित कर्मचारी, रेस्टॉरंटचा परवाना नसणे इत्यादी अनेक आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर व्यवस्थापनाविरोधात कोणतीही कारवाई न करणाऱ्या एफडीए मधील संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द ही कारवाई केली गेली नाही, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार ताज हॉटेलच्या व्यवस्थापनावर व यांस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर व्यवस्थापनाविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, नियम व निरसन २०११ मधील कलम ३२ (१) नुसार कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांचा दर्जा सुधारण्याबाबत

**(४८) * ११६५९९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) ने माहे एप्रिल, २०१८ मध्ये जाहिर केलेल्या क्रमवारीत महाराष्ट्रात पारंपारिक विद्यापीठांच्या क्रमवारीत सावीत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नवव्या क्रमांकासह स्थान मिळविणारे राज्यातील पहिले विद्यापीठ असून क्रमवारीत औरंगाबादचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ १०० ते १५० च्या क्रमवारीत तर मुंबई व जळगावचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांचा क्रमांक १५१ ते २०० च्या दरम्यान आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा खालावला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) एनआयएफआरच्या मानाकंनानुसार विद्यापीठाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने दिनांक २० एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयान्वये कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील व्यायामशाळा बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(४९) * ११९३०१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ या कालावधीत मंजूर करण्यात आलेल्या व्यायामशाळा बांधकाम अनुदानामध्ये गैरप्रकार होऊन व्यायामशाळा बांधकाम कागदोपत्री पूर्ण दाखविल्याची व अस्तीत्वात नसलेल्या व्यायामशाळांना साहित्य वाटप अनुदान मंजूर करून गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच व्यायाम साहित्य खरेदीबाबत संपूर्ण प्रक्रीया तपासून पाहणे व साहित्य पुरवठा अहवाल याबाबत अनुदानीत संस्थांची तपासणी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती यांचेमार्फत करण्यात येवून याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय, असल्यास अहवालाचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार व्यायामशाळा बांधकाम व साहित्य वाटप अनुदान मंजूर करण्यात अनियमितता व गैरप्रकार करणा-या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती विभाग, अमरावती यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांचेद्वारे व्यायामशाळा बांधकाम व व्यायाम साहित्य याकरिता अनुदान वितरीत करण्यात आलेल्या संस्थांची तपासणी करुन दिनांक २२.०६.२०१८ च्या पत्रान्वये अहवाल क्रीडा संचालनालयास सादर केला आहे. त्याअनुषंगाने तपासणी दरम्यान ज्या १८ संस्थांनी अनुदानाचा गैरवापर केला आहे त्या संस्थांना मंजूर अनुदान रक्कम व्याजासह वसुल करणेबाबत तसेच व्यायाम साहित्य असून वापर न केलेल्या

१६ संस्थांना व्यायाम साहित्याचा वापर व व्यायामशाळा सुरु करणेबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांच्यामार्फत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## शालार्थ सेवा प्रणालीमध्ये शिक्षकांचे नाव समाविष्ट करण्याबाबतचे प्रस्ताव

**(५०) * ११७३४७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालार्थ सेवा प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतचे अनेक शिक्षकांचे प्रस्ताव प्रलंबित असून त्यातील मुंबई विभागातील सुमारे दोनशेहून अधिक शिक्षक एक वर्षापासून विनावेतन काम करित असल्याची बाब माहे मे २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ प्रणालीच्या दुरुस्तीच्या नावाखाली गत ५ महिने वेतन अदा केले नसल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शालार्थ क्रमांकाचे प्रस्तावांवर निर्णय घेण्यासाठी शिक्षण संचालकांकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव निकाली काढण्याबाबत शालेय शिक्षण विभागाने निर्देश देऊनही अद्यापपर्यंत कोणताही निर्णय न होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर शिक्षकांचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) शालार्थ आयडी देण्याबाबतचे एकूण २७८४ प्रस्ताव प्राप्त झाले असून २०५४ प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन ८७५ प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे तसेच परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त होत नसल्यामुळे विलंब होत आहे.
(५) प्रलंबित प्रस्तावावर कार्यवाही करण्यासाठी दिनांक २८.२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाची संख्या विचारात घेऊन दिनांक २२.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये अन्य शिक्षण संचालकांकडे प्रस्ताव विभागून देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.